**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक ३०६ । सोमवार ७ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## ‘पार्टी विथ डिफरन्स’ या विच्रारावर काम होत असल्याने भाजप हा ग्रेटच पक्ष - सभापती प्रा.राम शिंदे

### भाजपची जिल्हा पदाधिकारी बैठक शहरात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पार्टीही संघटनात्मक ढाच्यावर भक्कमपणे उभी आहे. पक्षाचा डीएनए हा प्रखर विरोधकाचा असला तरी आता सत्ताधारी असा दोन्ही प्रकारचा आहे. पार्टी विथ डिफरन्स या विच्रारावर काम होत असल्याने भाजप हा ग्रेटच पक्ष आहे. त्यामुळेच गेल्या १७ वर्षांपासून देशात सत्ताधारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या योग्य कामामुळे भाजपला हे चांगले दिवस आले आहेत. त्यांच्या कार्याचा अभिनंदनचा ठराव मांडून तो सर्वांनी मंजूर करावा, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी करून भविष्यात जिल्हा परिषद, नगरपंचायत, ग्राम पंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. यांचे नियोजन आत्तापासूनच करणे आवश्यक आहे. बोगस मतदार घालवण्यासाठी एसआयआरचा दुसरा टप्पाही यशस्वी करावा, असे आवाहन सभापती शिंदे यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या शहर, दक्षिण व उत्तर जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन रविवारी नगर शहरात



झाले. यावेळी सभापती प्रा.राम शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, जिल्हा प्रभारी राम सातपुते, शहराच्या प्रभारी व प्रदेश सचिव भैरवी वाघ पलांडे, आ.विक्रमसिंह पाचपुते, आ.अक्षय कर्डिले, उपमहापौर धनंजय जाधव, यांच्यसह तिन्ही जिल्ह्याचे उपाध्यक्ष, सरचिटणीस, सर्व मोर्चांचे अध्यक्ष शहरातील व जिल्ह्यातील नगरसेवक व नगराध्यक्ष यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

सभापती राम शिंदे पुढे म्हणाले, सध्याच्या आधुनिक काळात समाज मध्यमांना महत्व आले आहे. त्यामुळे भाजपचा प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्ता प्रशिक्षित व सक्षम असावा यासाठी पक्षाचे सर्वत्र प्रशिक्षण वर्गाचे आयोजन होत आहे. विरोधकांच्या खोट्या नॅरेटीव्हला योग्यप्रकारे उत्तर देणे आवश्यक आहे. आज अशाप्रकारचे प्रशिक्षण वर्ग इतर कोणत्याच पक्षात होत नाहीत ते जवळपास संपलेच आहेत. त्यांच्या सध्या कार्यकारणीच्या बैठकाही होत नाहीत अशी भयानक परिस्थिती इतर सर्वच पक्षाची झाली आहे. त्यामुळे भाजपमध्ये येण्यासाठी रीघ लागली आहे.

आ.विक्रमसिंह पाचपुते म्हणाले, २०४७ सालच्या विकसित भारताची सर्वात मोठी शक्ती युवक आहे. आज भारतात सर्वात जास्त युवक आहेत म्हणून त्यांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. तरुण पिढीला योग्य दिशा देणे आवश्यक आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून विरोधक चुकीचे नॅरिटीव्ह सेट करत आहेत. त्यास चांगल्या प्रकारे उत्तर देणे आवश्यक आहे. यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अल्गोरिदमच्या पुढे जावे लागेल. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातून अनेक मोठ्या लाभदायक योजना राबवून सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यात आले आहे. देशाच्या या वाटचालीमध्ये पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारीचे योगदान आहे.

बैठकीचे प्रास्ताविक शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले. जिल्हास सरचिटणीस अशोक गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. बैठकीत ,युवाशक्ती संधी आणि विकसित भारताच्या संकल्पचे अभिनंदन, याचा प्रस्ताव आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी मांडला त्यास विश्वनाथ कोरडे यांनी अनुमोदन दिले. तसेच फेक निगेटिव्ह व अपप्रचाराला विकसित गाथा कथनाने उत्तर द्या हा प्रस्ताव आमदार अक्षय कर्डिले यांनी मांडला त्यास उपमहापौर धनंजय जाधव यांनी अनुमोदन दिले.

## श्रीगोंद्यातील धर्मवीर गड राज्य संरक्षित स्मारक घोषित

### राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय । आमदार विक्रम पाचपुतेंच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय पराक्रमाची आणि बलिदानाची साक्ष देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील धर्मवीर गड (पेडगाव) बाबत राज्य सरकारने एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाने ७ सप्टेंबर रोजी शासन निर्णय जारी करत या गडाला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे ऐतिहासिक वारसा असलेल्या धर्मवीर गडाचे जतन, संवर्धन आणि सुशोभीकरण करण्याचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.



श्रीगोंदाचे भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी धर्मवीर गडाच्या जतन आणि संवर्धनासाठी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. याआधी पाचपुते यांच्याच मागणीनुसार पेडगाव येथील या ऐतिहासिक बहादूरगडाचे नामकरण धर्मवीर गड असे अधिकृतपणे करण्यात आले होते. त्यानंतर आता हा ■ पान ४ वर

## पाऊस येण्यासाठी खरवंडी कासार ग्रामस्थांनी भोलेनाथाला पाण्यात बंदिस्थ केले

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** निसर्गाच्या अवकृपेमुळे चिंतेत सापडलेल्या खरवंडी कासार येथील ग्रामस्थांनी अखेर वरुण राजाला प्रसन्न करण्यासाठी भोलेनाथाच्या चरणी धाव घेतली आहे. परिसरात पाऊस नसल्याने उभी पिके करपून गेली असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. मूक जनावरे पाण्यासाठी हंबरडा फोडत आहेत, तर पाणीटंचाईचा मोठा फटका स्थानिक बाजारपेठेलाही बसला आहे.



(छाया : सतिष जगताप)

गावातील चहाची हॉटेल्स आणि दुकाने ओस पडली आहेत. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी संपूर्ण गावाने एकत्र येत एक अनोखे साकडे घातले आहे. ■ पान ४ वर

## महापालिका रुग्णालयाच्या आरक्षणावर खासगी रुग्णालयाला परवानगी; आठ आठवड्यांत निर्णय घेण्याचे प्रधान सचिवांना उच्च न्यायालयाचे आदेश

### भूखंडधारकांनी भूसंपादनाची मागणी करूनही ‘अंगद मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल’ला बांधकाम परवानगी; आयुक्तांचा ‘१५ कोटी वाचल्याचा’ दावा दिशाभूल करणारा असल्याचा शेख यांचा आरोप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडीतील महापालिका रुग्णालयासाठी विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या जागेवर अंगद मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल्स प्रा. लि. या खासगी रुग्णालयाला विकास व बांधकाम परवानगी दिल्याचे प्रकरण आता शासनाच्या वरिष्ठ स्तरावरील परीक्षणाखाली आले आहे. सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने त्यांच्या दि. १२ जून २०२६ रोजीच्या निवेदनावर आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून आठ आठवड्यांच्या आत गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याचे आदेश प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना दिले आहेत.

मौजे सावेडी येथील सर्वे नं. ९/२/१बी/२ व १२/४/१२/५ब मधील जागा मंजूर विकास आराखड्यात ‘-४३ ’ म्हणून महापालिका रुग्णालयासाठी आरक्षित आहे. मात्र, याच जागेवर खासगी रुग्णालयासाठी भूखंड एकत्रीकरण तसेच विकास व बांधकाम परवानगी देण्यात आल्याने सार्वजनिक रुग्णालयाच्या आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच अडथळा निर्माण झाल्याचा आक्षेप आहे. सर्वे नं. १२/४/१२/५ब मधील १०० चौरस मीटर क्षेत्र आपल्या संयुक्त मालकीचे असल्याचे नमूद करून किशोर सोन्याबापू



वाकळे आणि उदय शिवाजीराव कराळे यांनी महापालिका आयुक्तांना खरेदी सूचना दिली होती. आरक्षणाने बाधित जमीन महापालिकेने भूसंपादित करून योग्य मोबदला द्यावा, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली होती. भूखंडधारकांनी मोबदल्यापोटी स्वीकारण्यास तसेच अंतर्गत जागेचा विकास करण्यासही नकार दर्शविला होता. भूखंडधारकांकडून भूसंपादनाची मागणी करण्यात आलेली असताना महापालिकेने जमीन संपादित करून सार्वजनिक रुग्णालय उभारण्याऐवजी त्याच आरक्षित जागेवर खासगी रुग्णालयाला परवानगी दिल्याचा आरोप आहे. ■ पान ४ वर

## शिक्षक दिनी शिक्षकांचे काळ्या फिती लावून धरणे आंदोलन; जुन्या पेन्शनसाठी शासनाला अल्टिमेटम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षक दिनी, शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काळ्या फिती लावून धरणे आंदोलन केले. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी आंदोलक शिक्षकांनी जोरदार घोषणाबाजी करीत शासनाच्या धोरणाचा निषेध केला. आंदोलकांच्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.
जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे, राज्य समन्वयक सुनील भोर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी सुनील पंडित, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, रमजान हवालदार, आप्पासाहेब जगताप, सचिन झगडे, भाऊसाहेब कचरे, देविदास खेडकर, संजय इघे, सुनील दानवे, संजय वाळे, राज गवांदे, संजय भुसारी, सुदाम दळवी, वैभव सांगळे, जाकीर सय्यद, कैलास राहणे, मिथुन डोंगरे आदींसह जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.
दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या विनाअनुदानित अथवा अंशतः अनुदानित कायम आस्थापनेवरील नियमित वेतनश्रेणीतील तसेच त्यानंतर १०० टक्के अनुदान प्राप्त प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.
राज्यातील सुमारे २६ हजार पेन्शनपीडित शिक्षक-कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. या मागणीसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वी विविध आंदोलने, निवेदने, मोर्चे आणि इतर लोकशाही मार्गांचा अवलंब करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, वारंवार आंदोलने करूनही या प्रश्नावर शासनाकडून अद्याप ठोस निर्णय घेण्यात आलेला नसल्याचा आरोप जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाने केला आहे. शिक्षकांचा सन्मान करण्याचा दिवस म्हणून शिक्षक दिन साजरा केला जात असतानाच शिक्षकांनाच आपल्या न्याय्य हक्कासाठी आंदोलन करावे लागत असल्याची खंत आंदोलकांनी व्यक्त केली. शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि भावी पिढी घडविणाऱ्या शिक्षकांच्या भविष्याशी संबंधित पेन्शनचा प्रश्न शासनाने गांभीर्याने सोडवावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक



अहिल्यानगर शहरातील गंगा उद्यान येथे शनिवारी दहीहंडीचा उत्साह पाहायला मिळाला. अजिंक्य युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दहीहंडी फोडण्याचा गोविंदा पथकांनी अटोकाट प्रयत्न केला. मुंबईच्या पथकानेही सहा थरांची सलामी देत थरार निर्माण केला.

(छायाचित्र- उदय जोशी)

## दहीहंडीचा जल्लोष, शिक्षकांचा सन्मान आणि रक्षाबंधनाचा उत्साह



**अहिल्यानगर - केडगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्यालयात गोकुळाष्टमी, शिक्षक दिन आणि रक्षाबंधन या त्रिवेणी कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. यावेळी गोकुळाष्टमीनिमित्त विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला. राधा व श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सजलेल्या बालकांनी उपस्थितांचे मन मोहून घेतले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी व कृष्णजन्माच्या गीतांनी कार्यक्रमाला भक्तिमय रंगत आणली. दहीहंडी फुटताच हाथी घोडा पालखी... जय कन्हैया लाल की...या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर दणाणून गेला. लहानग्या गोविंदांच्या उत्साहात संपूर्ण विद्यार्थीवर्ग सहभागी झाला. गोकुळाष्टमीनिमित्त शाळेच्या अंगणात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या, तसेच फुलांची सुंदर सजावट करण्यात आली होती. यावेळी शिक्षक दिनानिमित्त विद्यालयातील सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. रक्षाबंधनानिमित्तही विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. डॉ. श्री. शिवाजीराव देसाई यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी श्री. सोमनाथजी झाडे, नगरसेवक मनोज कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य संभाजी पवार, शाळेचे मुख्याध्यापक संदीप भोर, तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. मुख्याध्यापक संदीप भोर प्रास्ताविकात म्हणाले की, दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यामागे विद्यार्थ्यांमध्ये एकीची व सहकार्याची भावना निर्माण व्हावी, हा प्रमुख उद्देश आहे. विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नेहमीच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या माध्यमातून भारतीय संस्कृती व परंपरा जपण्याचे कार्य विद्यालय सातत्याने करत आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करतात. शिक्षकांप्रती आदर, कृतज्ञता आणि सन्मान व्यक्त करण्याचा दिवस म्हणून शिक्षक दिन साजरा केला जात असल्याचे सांगितले. नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, माखनचोर श्रीकृष्णाने आपल्या लीलांमधून प्रेम, एकता आणि धैर्याचे प्रतीक निर्माण केले. त्यातूनच आज आपण दहीहंडीसारख्या उत्सवात एकत्र येतो. एकमेकांच्या खांद्यावर विश्वास ठेवून उंच हंडी फोडणे ही केवळ परंपरा नसून एकजूट, सहकार्य आणि जिद्दीची परीक्षा असल्याचे स्पष्ट केले. डॉ. श्री. शिवाजीराव देसाई यांनी विद्यार्थ्यांना दहीहंडीच्या शुभेच्छा देताना सांगितले की, आजच्या काळातही दहीहंडी आपल्याला महत्त्वाचा संदेश देते. स्पर्धा असो, शिक्षण असो किंवा आयुष्यजिंकण्याची खरी मजा टीमवर्कमध्ये असते. विद्यालयातील गोविंदा पथक जेव्हा उंच मनोरा तयार करते, तेव्हा प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा असतो. कोणीतरी पाया मजबूत करतो, तर कोणीतरी वर जाऊन हंडी फोडतो; मात्र त्या यशाचे श्रेय सर्वांचे असते.विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षकांचे योगदान अनमोल आहे. शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचे व संस्कारांचे ऋण विद्यार्थ्यांनी सदैव लक्षात ठेवून त्यांच्या कार्याचा सन्मान केला पाहिजे. तसेच रक्षाबंधनातील राखी हा केवळ धागा नसून प्रेम, विश्वास आणि संरक्षणाचे प्रतीक असल्याचे म्हणाले.**

# सुतारवाडीत अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सुरुवात

**१३व्या वर्षात ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन; दररोज कीर्तन, भजन व अन्नदानाचा उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**ढवळपुरी–** पारनेर तालुक्यातील सुतारवाडी(ढवळपुरी) येथे हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ महाराज प्रतिष्ठान, समस्त ग्रामस्थ सुतारवाडी तसेच महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाचे हे वे१३ वर्ष असून, गतवर्षी सप्ताहाच्या १२व्या वर्षानिमित्त तपपूर्ती सोहळ्याचे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते.

दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीक्षेत्र स्वयंभू महादेव गड, माणिकदौंडी, ता. पाथर्डी येथील हरिभक्त परायण धर्माचार्य ह. भ. प. आजिनाथ महाराज आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. सप्ताहाच्या प्रारंभाने सुतारवाडी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला असून, पहाटेपासूनच हरिनामाचा गजर आणि टाळ–मृदंगाच्या निनादाने परिसर दुमदुमून जात आहे.

सप्ताहाच्या कालावधीत दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १२ ते १ गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८.३० ते १०.३० कीर्तन सेवा तसेच त्यानंतर महाप्रसाद व हरिजागराचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात विविध नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे. यामध्ये ह. भ. प. संजय महाराज म्हसे (शेलेगाव, राहुरी), ह. भ. प. शंकर महाराज भागवत (सोनई), ह. भ. प. रुपेश महाराज नायकवडी (साकूर), ह. भ. प. किशोर महाराज खाडे (बिडकर), ह. भ. प. मनोहर महाराज सिनारे, भागवताचार्य, श्रीक्षेत्र निंभेरे, ता. राहुरी, ह. भ. प. प्रकाश महाराज आव्हाड (दरेवाडी), ह. भ. प. महंत रामकृष्ण महाराज शास्त्री (मठाधिपती, श्रीक्षेत्र विठ्ठलगड) यांची कीर्तन सेवा होणार आहे.

सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने ह. भ. प. धर्माचार्य आजिनाथ महाराज आंधळे, श्रीक्षेत्र स्वयंभू महादेव गड, माणिकदौंडी यांच्या कीर्तन सेवेतून होणार आहे. कीर्तन व भजन सेवेसाठी गायनाचार्य आदित्य महाराज बोरुडे, महेश महाराज महात्मे, मृदंगाचार्य नारायण महाराज जाधव व हार्मोनियमची साथ लाभत आहे. त्यामुळे सप्ताहातील धार्मिक कार्यक्रमांना विशेष रंगत येत आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने सुतारवाडीमध्ये दैनंदिन मोठ्या प्रमाणावर अन्नदान करण्यात येत असून, भाविक भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. कीर्तन सेवेसाठी परिसरातील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती असते. ''हरिनामाच्या गजरातून समाजात भक्ती, संस्कार आणि एकोप्याची भावना वृद्धिंगत व्हावी,'' या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहामुळे सुतारवाडी परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. माऊली मंडप व डेकोरेशन सोनई तालुका नेवासा यांची अद्यावत साऊंड सिस्टिम व डेकोरेशन तसेच श्री वृद्धेश्वर वारकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र जवखेडे खालसा येथील वारकरी यांची सप्ताहस साथ लाभत आहे. सर्व भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन सेवा, हरिपाठ व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अवैध गुटखा–मावा विक्रेत्यांवर एलसीबीकडून १० ठिकाणी छापे

**वीस आरोपींवर गुन्हे, पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने अवैध गुटखा–मावा विक्रेत्याविरुद्ध मोहीम राबवून अकोले, राजूर, कर्जत, श्रीरामपूर शहर आणि श्रीगोंदा परिसरात एकाच वेळी १० ठिकाणी छापे टाकले. या प्रकरणी २० आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण पावणेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ४ व ५ सप्टेंबर रोजी पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे आणि ५ विविध पथकांतीलप अंमलदारांनी ही मोहीम राबविली. या छापेमारीत एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले असून २० आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली, तर २ लाख ७६ हजार ८९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपींवर भारतीय न्याय संहितेमधील कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) अन्वये विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

**आरोपींची नावे याप्रमाणे**

अकोलेत उल्हास रामदास वाकचौरे (वय ३६, रा. निंब्रळ, अकोले) व दिवटे किराणा चालक (फरार) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तर राजूर येथे अन्वर लियाकत तांबोळी (वय २८), रोशन कैलास रोकडे (वय २८, दोघे रा. राजूर) व मुबारक तांबोळी (फरार) तसेच दुस–या कारवाईत राजूरमध्ये अमन शमशुद्दीन तांबोळी (वय २८, रा. तांबोळी गल्ली, राजूर) व सोनु मुर्तडक (फरार)
यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. कर्जतमध्ये हुजेर मुसा काझी (वय ४०, रा. लांगोरे गल्ली, कर्जत) व सोनु (रा. आष्टी) तसेच दुस–या कारवाईत सुहास सतीश सुपेकर (वय ३४, रा. कुळधरण, कर्जत), शकील अजीज अतार (वय ५२, रा. कुळधरण) व जुनेद खान (फरार) यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. श्रीरामपूर शहरात केलेल्या कारवाईत मोहंमद अहमद हसन सय्यद (वय २६, रा. खंडाळा) व इलीयास शेख (फरार), नाजीम हारूण सय्यद (वय २४, रा. खंडाळा, श्रीरामपूर) यांच्यावर तर श्रीगोंदा येथे सतीश शिवाजी खामकर (वय ४३, रा. टाकळी कडेवाडी) व अमर कांबळे (फरार) तसेच महेश सर्जेराव गलांडे (वय ३३, रा. देऊळगाव), शोएब राजू तांबोळी (वय २६, रा. श्रीगोंदा) व फरहान व्यापारी (फरार) यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले.

**पर्युषण महापर्वनिमित्त ८ सप्टेंबर आणि १५ सप्टेंबर या दोन दिवशी अहिल्यानगर**

# जिल्ह्यातील सर्व कत्तलखाणे, मांस विक्री केंद्र बंद ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दरवर्षी प्रमाणे जैन धर्मियांचे पर्युषण महापर्व दिनांक ८ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर दरम्यान संपूर्ण देशात भक्तीमय वातावरणात साजरे केले जाणार आहे.

एच ए डब्ल्यू आर सदस्य ॲनिमल वेल्फेअर बोर्ड भारत सरकार तथा मिशन सेफ विहार ग्रुप अध्यक्ष यश शहा यांनी महाराष्ट्र शासन आदेश पत्र तसेच ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया यांचे याबाबतचे परिपत्रक जोडून निवेदन पत्राद्वारे अहिल्यानगर जिल्हा प्रशासन यांना विनंती केली होती . त्याला अनुसुरारून अहिल्यानगर जिल्हा प्रशासन यांनी शासन आदेश प्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यातील पर्युषण महापर्व निमित्त दरवर्षी प्रमाणे प्रथम दिवशी दिनांक ८ सप्टेंबर आणि शेवटच्या दिवशी १५ सप्टेंबर या दोन दिवशी जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने आणि सर्व प्रकारचे मांस विक्री केंद्र अहिल्यानगर जिल्हात बंद ठेवण्याबाबतचे आदेश पारित केले आहेत.

तसेच या आदेशाची अंमलबजावणी आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी प्रशासनाने याबाबतचे निर्देश परिपत्रकाद्वारे अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उपायुक्त पशुसंवर्धन, सर्व उपविभागीय दंडाधिकारी , सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन, सर्व तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सर्व, आणि इतर सर्व संबंधित प्रशासकीय विभाग यांना पाठवले आहेत. शहा यांनी देखील जिल्हा प्रशासन सदर आदेशाची अंमलबजावणी आणि योग्य ती कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी , अप्पर जिल्हा दंडाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना याबाबत स्वतः विनंती केली आहे. तसेच संपूर्ण महाराष्ट्र मध्ये शासन आदेशाचे अंबलबजावणी करण्याकरिता शासनास ईमेलद्वारे निवेदन पाठवून विनंती केली आहे.

# वक्तृत्वापासून नवकल्पनेपर्यंत; सेंट विवेकानंद स्कूलच्या विद्यार्थ्यांची दैदिप्यमान कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुणवत्ता, कल्पकता आणि मेहनतीच्या जोरावर सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध आंतरशालेय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचे आणखी एक पान जोडले आहे. विद्यार्थ्यांच्या या बहुआयामी कामगिरीमुळे शाळेच्या शैक्षणिक तसेच सहशालेय उपक्रमांची गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

अहिल्यानगर येथील येथे आयोजित करण्यात आलेल्या इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत शाळेचा इयत्ता दहावीचा विद्यार्थी अमोघ पाळसकर आणि इयत्ता सातवीची विद्यार्थिनी खानसा सय्यद यांनी प्रभावी वक्तृत्वाचे सादरीकरण करत तृतीय क्रमांकाच्या पारितोषिकात ट्रॉफी, सर्टिफिकेट व १००० रुपयांचे रोख बक्षीस पटकावले. आत्मविश्वासपूर्ण देहबोली, स्पष्ट उच्चार, आवाजातील योग्य चढ–उतार आणि विषयाची प्रभावी मांडणी यामुळे दोन्ही विद्यार्थ्यांनी परीक्षकांची विशेष दाद मिळवली.यांना इंग्रजी विषय शिक्षक शिरीन शेख, मनिष अहुजा, समिना पटेल, आशा रंगलानी, दिव्या पोखरणा या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.



दरम्यान, इंटरस्कूल प्रॉडक्ट डेव्हलपमेंट स्पर्धेत शाळेची इयत्ता आठवीची विद्यार्थिनी आर्या मखारे हिने आपल्या नाविन्यपूर्ण ' ' या प्रकल्पाचे प्रभावी सादरीकरण करत द्वितीय क्रमांक पटकावून – होण्याचा मान मिळवला. त्यात तिने ट्रॉफी, सर्टिफिकेट व १५०० रुपयाचे रोख बक्षीस मिळवले. सौरऊर्जेचा कल्पक वापर करून तयार केलेल्या या प्रकल्पातून नावीन्य, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा प्रकल्प तयार करण्यात तिच्या पालकांचा महत्वपूर्ण सहभाग होता.

आर्या मखारेच्या या अभिनव प्रकल्पाला परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. तिच्या या यशातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान नव्हे, तर संशोधन, प्रयोगशीलता, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्यावर शाळेचा भर असल्याचे अधोरेखित झाले.

वक्तृत्वाच्या व्यासपीठावर अमोघ व खानसाचे शब्दसामर्थ्य आणि नवकल्पनेच्या क्षेत्रात आर्याची वैज्ञानिक झेप, अशा या तिन्ही विद्यार्थ्यांच्या यशामुळे सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलच्या लौकिकात भर पडली आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या प्राचार्या गीता तांबे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कंचन पापडेजा, शिक्षकवृंद, सहकारी कर्मचारी व पालकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# पारनेरकर रहिवासी संघाची ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची दहीहंडी दिमाखात; कामोठ्यात भक्ती-शक्तीचा विराट जल्लोष

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** ''गोविंदा रे गोपाळा, यशोदेच्या तान्ह्या बाळा'' या जयघोषाने कामोठे परिसर दुमदुमला आणि मुंबईच्या भूमीत पारनेरकरांच्या एकजुटीचा बुलंद आवाज घुमला. पारनेरकर रहिवासी संघ (मुंबई स्थित) यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांच्या भव्य दहीहंडी उत्सवाचा आठवा सोहळा मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या रंगतदार उपस्थितीत पार पडला. सेक्टर ३६ येथील श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज मंदिराच्या प्रांगणात पारनेर नगर विधानसभा मतदार संघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांसह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या सोहळ्याला कामोठेसह मुंबई, नवी मुंबई, पनवेल तसेच परिसरातील पारनेरकर बांधवांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.
पारनेर, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यातील अनेक कुटुंबे नोकरी, उद्योग आणि व्यवसायाच्या निमित्ताने मुंबई, नवी मुंबई, पनवेल आणि रायगड परिसरात स्थायिक झाली आहेत. शहर बदलले, जीवनशैली बदलली, मात्र आपल्या गावच्या मातीशी आणि संस्कृतीशी असलेली नाळ कायम ठेवण्याचे काम पारनेरकर रहिवासी संघ सातत्याने करीत आहे. त्यामुळे दहीहंडीचा हा सोहळा केवळ धार्मिक उत्सव न राहता पारनेरकरांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक एकजुटीचा उत्सव ठरला.
यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे महिला पथकाची मानाची दहीहंडी. महिलांना पारंपरिक चौकटीबाहेर येऊन आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ देत संघाने महिला सहभागाला प्रोत्साहन दिले. महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' या कार्यक्रमालाही उत्स्फूर्त प्रतिसाद



मिळाला. त्याचबरोबर सुश्राव्य भजन, संगीत कार्यक्रम, विविध सांस्कृतिक उपक्रम आणि सायंकाळच्या भव्य आर्केस्ट्राने संपूर्ण परिसर उत्सवमय करून टाकला. सकाळी दहीहंडी पूजन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मुंबई, नवी मुंबई आणि उपनगरातील विविध गोविंदा पथकांनी सलामी देत मानवी मनोरे रचण्यास सुरुवात केली. उंचच उंच थर रचताना गोविंदांनी दाखविलेल्या चपळाई, धाडस आणि संघभावनेने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. या स्पर्धेत शिवप्रेरणा गोविंदा पथकाने प्रथम क्रमांक पटकावला, राजे शिवाजी स्पोर्ट्स क्लबने द्वितीय क्रमांक मिळविला, तर आई–बाबा पथक कामोठेने तृतीय क्रमांक मिळविला. सहभागी गोविंदा पथकांचा पारनेरकर रहिवासी संघाच्या वतीने बक्षिसे आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या सोहळ्यास पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर, आमदार प्रशांत ठाकूर, सभापती रवींद्र जोशी, विकासदादा घरत, कामोठे मंडळाचे अध्यक्ष संदीप पाटील, राहुल पाटील शिंदे, प्रशांत गायकवाड, वसंत छडे, विजुभाऊ औटी, सचिन पाटील वराळ, दत्ता कुलट, नगरसेवक भाऊ भगत, मेघना गाडगे, सागर पाटील यांच्यासह सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. दहीहंडी पूजन धनराज विसपुते, शामसुंदर कुलथे, ज्योती देशमुख, पोलीस निरीक्षक कामोठे तसेच मोहन पवार, पोलीस उपनिरीक्षक कामोठे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, पारनेर तालुक्यातील हजारो कुटुंबे रोजगार, नोकरी आणि व्यवसायाच्या निमित्ताने मुंबई–नवी मुंबईच्या भूमीत आली असली तरी आपल्या मातीशी असलेले नाते आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान त्यांनी कधीही सोडलेला नाही. पारनेरकर रहिवासी संघाचा दहीहंडी उत्सव त्याचेच उत्तम उदाहरण आहे. दहीहंडी हा केवळ श्रीकृष्ण भक्तीचा उत्सव नसून संघभावना, परस्पर सहकार्य, धाडस आणि एकजुटीचा संदेश देणारा उत्सव आहे. आज या ठिकाणी एकत्र आलेली पारनेरकरांची मोठी उपस्थिती ही त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक एकतेची साक्ष आहे. ही एकजूट भविष्यात समाजहिताच्या आणखी मोठ्या कामांसाठी उपयोगी पडावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पारनेरकर रहिवासी संघाच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट यांना श्रद्धास्थान आणि पद्मभूषण अण्णा हजारे यांना प्रेरणास्थान मानून सामाजिक बांधिलकीची भावना जपण्याचा संघाचा प्रयत्न आहे. मुंबईच्या धावपळीच्या जीवनातही आपल्या गावची परंपरा, सण–उत्सव आणि आपली माणसं यांना एकत्र आणण्याचे काम संघाच्या माध्यमातून केले जात आहे. त्यामुळे या दहीहंडी उत्सवाला पारनेरकरांच्या भावनिक एकजुटीचे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष भाऊशेठ पावडे, कार्याध्यक्ष कुंडलिकशेठ वाफारे, सचिव कृष्णाशेठ ढोमे, उपाध्यक्ष दिलीपशेठ घुले, सहसचिव संजयशेठ आहेर यांच्यासह मनोज कवडे, महादेवशेठ पुंडे, धनंजयशेठ निमसे, शुभम वाफारे, जालिंदरशेठ खोसे, सबाजीशेठ जराड, गणेश गुंड, प्रशांत ठुबे, अमोल डोंगरे, अक्षय मगर, विलास लांडगे, तुषार लांडगे, डॉ. सिताराम गुंड, माऊली तांबोळी, अश्विन गायखे, बन्सी पागिरे, एकनाथ लामखडे आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

मुंबईच्या गर्दीत पारनेरची ओळख जपणारा, हजारो कुटुंबांना एकत्र आणणारा आणि नव्या पिढीला आपल्या मातीशी जोडणारा हा दहीहंडी सोहळा पारनेरकरांच्या संघटित शक्तीचा जागर ठरला. नोकरी–व्यवसायासाठी शहराच्या कितीही दूर गेलं तरी मातीची ओढ आणि माणसांची नाळ कधी तुटत नाही, हे या सोहळ्याने पुन्हा एकदा सिद्ध केले. ''वारसा संस्कृतीचा पारनेरकरांच्या एकजुटीचा!'' या भावनेतून साजरा झालेला हा दहीहंडी उत्सव पारनेरकरांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिक एकतेचा अविस्मरणीय अध्याय ठरला.
पारनेरचे कामदार आमदार काशिनाथ दाते सर यांनी गेल्यावर्षी दहीहंडी उत्सवात दिलेला मौलिक सल्ला आम्ही मनापासून स्वीकारला आणि तालुक्याची एकी दाखविण्यासाठी सर्वांनी राजकीय झेंडे बाजूला ठेवून एकाच दहीहंडीच्या माध्यमातून एकत्र यावे, यासाठी आम्ही प्रयत्न केले. कामोठेला 'मिनी पारनेर' म्हणून ओळखले जाते; त्यामुळे पारनेरकरांची मजबूत संघटना उभी करण्याची ही संधी आम्हाला महत्त्वाची वाटत होती. मात्र, आमच्याकडून एकजुटीसाठी प्रामाणिक प्रयत्न करूनही समोरून अपेक्षित प्रतिसाद मिळू शकला नाही, याची खंत आहे. भविष्यातही राजकीय मतभेद बाजूला ठेवून पारनेरकरांच्या हितासाठी सर्वांनी एकत्र यावे, हीच आमची भूमिका आहे.
–संजय आहेर
(सचिव, पारनेरकर रहिवाशी संघ दहीहंडी उत्सव समिती)

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)


## दै. आकर्षण निवडक

### पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हरदिन मॉर्निंग ग्रुपचा शिक्षक दिन उत्साहात

अहिल्यानगर - शिक्षक दिनाचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये आजी-माजी शिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच ग्रुपचे सदस्य, आजी-माजी शिक्षक व उपस्थित मान्यवरांनी एकत्रितपणे उद्यान परिसरात स्वच्छता अभियान राबवून सामाजिक बांधिलकी जपली.कार्यक्रमाच्या प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती, शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच महिला शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे स्मरण करत उपस्थितांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर उद्यान परिसरात वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली. उज्वला कळमकर, सुरेखाताई आमले, मीराबाई आल्हाट, छावणी परिषदेचे राजेंद्र भोसले, विलास तोडमल, चांदेकर सर, नवनाथ आमले आणि श्यामसुंदर खेले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उद्यान परिसरातील स्वच्छता अभियानात हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, आजी-माजी शिक्षक आणि उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे, वृक्षांचे संरक्षण करणे आणि पर्यावरणाबाबत समाजात जागृती निर्माण करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.यावेळी संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, प्रमोद मुळे, जहीर सय्यद, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, डॉ. सुचिता मांजरे, साधनाताई पोखरणा, आरती बोराडे, प्रांजली सपकाळ, मनिषा गायकवाड, पौर्णिमा खेले, निकिता वैद्य, ताराचंद ठोकळ, अशोक पराते, सर्वेश सपकाळ, संजय कार्ले, योगेश चौधरी, रामनाथ गर्जे, प्रकाश देवळालीकर, मुन्ना वाघस्कर, जालिंदर अळकुटे, सुंदरराव पाटील, दशरथ मुंडे, कुमार धतुरे, नारायण नायकू, अभिजीत सपकाळ, दिनेश शहापूरकर, रामदास मोहिते, उमाशंकर सिंग, देविदास गंडाळ, प्रशांत भिंगारदिवे, संतोष लुनिया, जोगिंदरसिंग, सतरंजन भुलिया, ओम प्रकाश गुप्ता, इंजि. अनिल सोळसे आदी उपस्थित होते. दिलीप ठोकळ व सुरेखा आमले यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच सुभाष होडगे, संजय शिंदे, किसन मेहेर आणि राजेंद्र कळमकर यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

संजय सपकाळ म्हणाले की, शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान देणारा घटक नसून भावी पिढीमध्ये संस्कार, सामाजिक मूल्ये आणि जबाबदारीची जाणीव जिवंत ठेवणारा महत्त्वाचा प्रवाह आहे. चार भिंतींच्या आत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याबरोबरच त्यांना जगात आत्मविश्वासाने भरारी घेण्यासाठी ज्ञानरूपी बळ देण्याचे कार्य शिक्षक करतात. विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देण्याची आणि त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याची ताकद शिक्षकांमध्ये आहे. आज पर्यावरणाचा समतोल मोठ्या प्रमाणात बिघडत आहे.

### शिवाजी बोरुडे यांचे निधन



अहिल्यानगर - बालिकाश्रम रोडवरील बोरुडे मळा येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व प्रगतशील शेतकरी शिवाजी मनाजी बोरुडे यांचे शनिवार (दि.५ ऑगस्ट) सकाळी ९.१५ वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. अहिल्यानगरमध्ये घोडा टांगा शर्यत सुरू करण्यामध्ये त्यांच्या पुढाकार होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, एक भाऊ, तीन बहिणी, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. पत्रकार किरण बोरुडे यांचे ते चुलत मोठे बंधू होते.

# शेवगावात रंगणार 'नगराध्यक्ष भव्य दहीहंडी उत्सव २०२६'

**१,११,१११ चे भव्य बक्षीस व ट्रॉफी उद्योग व मराठी भाषा मंत्री मा. ना. उदयजी सामंत, शिवसेना खासदार मा. श्री. संदीपानजी भुमरे पाटील, माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील, आमदार श्री. विठ्ठलराव लंघे पाटील व आमदार श्री. अमोलजी खताळ तसेच शिवसेना जिल्हाध्यक्ष बाबूशेठ टायरवाले, अनिल शिंदे यांची प्रमुख उपस्थिती**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** दरवर्षीप्रमाणे यंदाही शेवगाव शहरातील धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपत 'नगराध्यक्ष भव्य दहीहंडी उत्सव २०२६' चे भव्य नियोजन करण्यात आले आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पावन पर्वावर भक्ती, उत्साह आणि जल्लोषाने न्हाऊन निघणारा हा भव्य सोहळा मंगळवार, दि. ०८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठीक ०६.०० वाजता खंडोबा मैदान, शेवगाव येथे रंगणार आहे.

या भव्य दहीहंडी उत्सवाला राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री मा. ना. उदयजी सामंत साहेब, छत्रपती संभाजीनगरचे शिवसेना खासदार मा. श्री. संदीपानजी भुमरे पाटील, अहिल्यानगरचे माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील, नेवासा तालुक्याचे शिवसेना आमदार श्री. विठ्ठलराव लंघे पाटील,संगमनेर तालुक्याचे शिवसेना आमदार श्री.अमोलजी खताळ तसेच अहिल्यानगरचे शिवसेना जिल्हाध्यक्ष श्री.बाबूशेठ टायरवाले,श्री.अनिलजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. जिल्ह्यातील विविध पदाधिकारी, व मान्यवरांच्या उपस्थितीने या उत्सवाची शोभा आणखी वाढणार आहे.

दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकासाठी १ लाख ११ हजार १११ चे भव्य रोख बक्षीस व आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार असून, उत्तेजनार्थ पाच संघांना प्रत्येकी ११ हजार रुपयाचे रोख बक्षीस देण्यात येणार आहे. त्यामुळे विविध गोविंदा पथकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणून लावणी सम्राट व रील स्टार स्नेहा पिंपरीकर यांचा बहारदार कार्यक्रम रंगणार आहे. तसेच दि.०९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'धप्पा' चित्रपटाचे दिग्दर्शक, कलाकार, सहाय्यक कलाकार आणि संपूर्ण चित्रपटाची टीम या सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहणार आहे.

भक्ती, परंपरा, सांस्कृतिक उत्साह आणि युवा शक्तीचा संगम असलेल्या या भव्य दहीहंडी उत्सवात शेवगाव शहरातील नागरिक, गोविंदा पथके, युवक-युवती आणि कृष्णभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन शिवसेना नेते श्री. अरुणभाऊ मुंढे, लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. माया अरुण मुंढे आणि दहीहंडी उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. या भव्य उत्सवाचे आयोजन दहीहंडी उत्सव समिती,शेवगाव शहर व वंदे मातरम् ग्रुप, शिवसेना नेते मा. अरुणभाऊ मुंढे मित्र मंडळ,शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

# उपवर्गीकरण रद्द करा, संविधान वाचवा; ६ ऑक्टोबरला अहिल्यानगरात विराट मोर्चा

**सरकारने उपवर्गीकरणाचा घाट मागे घ्यावा; अन्यथा हिवाळी अधिवेशनात विधानभवनाला घेराव– आनंदराज आंबेडकर**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

